**Alumni Meet in Nutan Maratha College, Jalgaon.**

लोकमत

अध्यक्ष ॲड. सुशील अत्र याच्या हस्ते स्मिता बागूल मोरे, राधा थोरात, मनोज केले.



माजी विद्यार्थ्यांसह प्राचार्य एल.पी.देशमुख, प्रा.राजू पाटील व मान्यवर.

# 'नूतन मराठा'त माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** नूतन मराठा महाविद्यालयात 'वुई नूतनीयन्स अलुमिनी असोसिएशन' या माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेच्यावतीने महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा रविवारी उत्साहात झाला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख होते. असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजू पाटील, उपाध्यक्ष प्रा. डॉ. डी.आर.चव्हाण, सचिव ॲड. प्रवीण शिंदे, सदस्य प्रा.डॉ. नितीन बाविस्कर, प्रा. डॉ. इंदिरा पाटील, मंगेश साळुंखे, साजिद शेख, हर्षल पाटील उपस्थित होते. संस्थेचे संचालक विरेंद्र भोईटे हे देखील उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. राजू पाटील यांनी केले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी जयसिंग वाघ यांनी नूतन मराठा महाविद्यालय म्हणजे चळवळीचे माहेरघर आणि बहुजन, मागास विद्यार्थ्यांना फक्त दहा रुपयात प्रवेश देणारी संस्था असा महाविद्यालयाचा गौरव केला. जैन इरिगेशनमध्ये टिश्यूकल्चर विभागात कार्यरत असलेले अनिल पाटील यांनीही जुन्या आठवणींना उजाळा दिला. सुनील गरुड, विकास पवार, शशिकांत शिंदे, पल्लवी शिंपी, कांचन धांडे यांनीही आठवणी जागविल्या. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशन दिल्लीचे विद्यमान सचिव डॉ. मनीष जोशी, डॉ. अजय उपाध्ये (लंडन), कबचौउमविच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. राजेंद्र नन्नवरे यांनी आपण या महाविद्यालयामुळे कसे घडलो अशा भावना सांगितल्या. प्राचार्य डॉ एल. पी. देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन राजेंद्र देशमुख यांनी केले तर ॲड.प्रवीण शिंदे यांनी आभार मानले. संघटनेच्यावतीने दुर्गा ठाकूर, हर्षल पाटील, अरुण वांद्रे यांचा सत्कार करण्यात आला.

Hello Jalgaon
Page No. 2 Jul 31, 2023
Powered by: erelego.com